High Accolades for a Socially Useful Project by Second year students

AIT is very proud to inform you all about an outstanding achievement of two of our **second year students** Sourabh Singh and Nidhi of E&TC branch. Their project "MOSQUITO DETECTOR, COUNTER AND ALERTER". This project involves intelligent devices and IoT technologies to create "Heatmaps" of Mosquito population in specific areas, which can lead to precision defogging and spraying, and substantial saving of public money.

This project has won the second prize in "Tata Communications and CII" "Grand India IoT Innovaton Challenge". Please go through https://www.tatacommunications.com/media-alert/iit-bhubaneswars-iot-solution-to-analyse-lpg-consumption-declared-winner-of-tata-communications-and-ciis-first-edition-of-grand-india-iot-innovation-challenge/

The team won Rs Three Lakh and opportunity to work with Tata Communications to develop "Patentable Technology"

The same project has also been selected by AICTE amongst 117 projects countrywide for the "AICTE-ECI-ISTE CHHATRA VISHWAKARMA AWARDS 2018". These projects will be displayed in an exhibition in New Delhi on 02 and 03 Jan 19. Final winners will be declared after then.

Please see the newspaper article in local Marathi newspaper "Loksatta" (of Express group) which also has a comment from the Director.

लोकसत्ता   WWW.LOKSATTA.COM

पुणे, शनिवार, १५ डिसेंबर २०१८

छात्र विश्वकर्मा पुरस्कारांत महाराष्ट्राची आघाडी

देशभरातील ११७ प्रकल्पांची निवड, राज्यातील २६ प्रकल्पांचा समावेश

प्रतिनिधी, पुणे

तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी नवनिर्मिती करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) सुरू केलेल्या छात्र विश्वकर्मा पुरस्कारात राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. या पुरस्कारासाठी राष्ट्रीय स्तरावर ११७ प्रकल्पांची निवड करण्यात आली असून, त्यात महाराष्ट्रातील सर्वाधिक २६ प्रकल्पांची निवड झाली.

दिल्लीमध्ये २ आणि ३ जानेवारीला होणाऱ्या प्रदर्शनासाठी निवडलेल्या प्रकल्पांची यादी एआयसीटीईने जाहीर केली. एआयसीटीईसह इंजिनिअरिंग कौन्सिल ऑफ इंडिया (ईसीआय) आणि इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल

एज्युकेशन (आयएसटीई) यांच्या संयुक्त विद्यमाने छात्र विश्वकर्मा पुरस्कार २०१८ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमासाठी 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गावांचे सबलीकरण' ही संकल्पना देण्यात आली होती. या विषयांतर्गत अभिनव प्रकल्प तयार करून सहभागी होण्याचे आवाहन एआयसीटीईने अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना केले होते. त्यानुसार महाविद्यालयांनी प्रकल्प पाठवल्यानंतर तज्ज्ञांच्या समितीच्या माध्यमातून निवडक ११७ प्रकल्प प्रदर्शनासाठी निवडण्यात आले.

महाराष्ट्रातील महाविद्यालयांनी तयार केलेले कचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा, पिकांच्या आरोग्याची निगा राखणे, कृषी यंत्रमानव, पाण्याचे व्यवस्थापन, पाटबंधारे

देशभरातून आलेल्या प्रकल्पांतील निवडक प्रकल्प दिल्लीतील प्रदर्शनात मांडले जातील. त्यातील सर्वोत्तम प्रकल्पांची विश्वकर्मा पुरस्कारासाठी निवड केली जाईल. महाराष्ट्राचे प्रकल्प सर्वाधिक आहेत, ही चांगली गोष्ट आहे.
— डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद

अशा विषयांवरील सर्वाधिक २६ प्रकल्प निवडले गेले आहेत. त्यात मुंबई, पुणे, इचलकरंजी, नाशिक, पनवेल, सोलापूर, कोल्हापूर आदी भागातील महाविद्यालयांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना उपयोजित, प्रकल्पाधिष्ठित शिक्षण देण्यावर आमचा भर असतो. त्यामुळे सातत्याने तेप्रयोग करतात, विविध स्पर्धांमध्ये सहभागी होतात. छात्र विश्वकर्मा ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा असल्याने त्यासाठी प्रकल्प निवडला जाणे आनंददायी आहे. आम्ही डासांविषयीचा नावीन्यपूर्ण प्रकल्प केला आहे. छात्र विश्वकर्मामध्ये निवड झालेल्या प्रकल्पांची संख्या पाहता महाराष्ट्र तंत्रज्ञानात, स्टार्ट अपमध्ये आघाडीवर असल्याचे स्पष्ट होते.
— ब्रिगेडियर (नि.) अभय भट, आमी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे

राज्य आणि निवडलेले प्रकल्प	
छत्तीसगड	१
गुजरात	३
मध्य प्रदेश	४
ओडिशा	१
पश्चिम बंगाल	७
उत्तर प्रदेश	१०
दिल्ली	१
हरयाणा	५
पंजाब	५
राजस्थान	५
आंध्र प्रदेश	१०
तेलंगणा	९
तामिळनाडू	१९
कर्नाटक	७
केरळ	३
महाराष्ट्र	२६